## <u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिपरी-४११०१८.</u>

## <u>"रखवालदार" पदाच्या लेखी परीक्षा बाबत.</u>

# <u>जाहिर निवेदन</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील **"रखवालदार"** अभिनामाची रिक्त पदे भरण्यसाठी दिनांक.३/२/१४ ते दि. १४/२/१४ या कालावधीत घेण्यात आलेल्या शारीरीक क्षमता चाचणी मधून लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची ६० गुणांची(सामान्य ज्ञान,मराठी,बौध्दिक क्षमता या विषयांवर आधारीत) लेखी परीक्षा **<u>रविवार दि.८/६/१४ रोजी श्री. म्हाळसाकांत विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, आकुर्डी पुणे-४११०३३.</u>** येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनी सदर ठिकाणी सकाळी ठीक १०.०० वाजता कागदपत्रे तपासणीसाठी शैक्षणिक अर्हतेच्या व इतर सर्व मूळ कागदपत्रांसह उपस्थित रहावे. कागदपत्रे तपासणी झाल्यानंतर **<u>त्याच दिवशी सकाळी ठीक ११.३० वाजता लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे.</u>** सदर लेखी परीक्षेस उपस्थित राहण्यासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना दि.२०/५/१४ अन्वये स्पीड पोस्टाने पत्रे पाठविण्यात आली आहेत.

शारीरीक क्षमता चाचणी परीक्षेतील प्राप्त गुण व लेखी परीक्षेत मिळणारे गुण यांच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करुन निवड प्रक्रीया पुर्ण करण्यात येईल.

शैक्षणिक अर्हतेसंबंधीची व इतर आवश्यक सर्व कागदपत्रे उक्त लेखी परीक्षेच्या वेळी तपासणीसाठी सादर करणे आवश्यक आहे. जे उमेदवार कागदपत्रांची पूर्तता करणार नाहीत अथवा त्यांनी दिलेली माहिती चुकीची,दिशाभूल करणारी आढळून आल्यास अशा उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी तात्काळ अपात्र करण्यात येईल व जाहिरातीतील अट.क्र.१८ नुसार **<u>"अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस/मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण करणारा न आढळल्यास,दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्द होईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता नियुक्ती समाप्त करण्यात येईल."</u>** येईल.तसेच जाहिरातीतील अन्य अटी व शर्तीची पूर्तता न करणा-या उमेदवारांनाही लेखी परीक्षेसाठी अपात्र ठरविण्यात येऊन अशा उमेदवारांचा निवडीसाठी विचार करण्यात येणार नाही.

क्रमांक प्रशा/५/कावि/३७६/१४
दिनांक.२०/५/२०१४.

२०/०५

सहाय्यक आयुक्त (प्रशासन)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११०१८.